# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

**प्रेस नोट दि.०४/०४/२०२२**

**अंतरराज्य तस्करी करणा-या गुन्हेगारांस १९८ किलो गांजासह घेतले ताब्यात,**
**६३ लाख ३४ हजारांचा गांजा व गांजांची वाहतुक करणारे वाहन यासह तीन आरोपी अटक,**
**अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेची कारवाई**

---

पिंपरी चिंचवड शहरामध्ये चोरुन व लपुनछपुन होणारी गांजा विक्री, साठवणुक व वाहतुकीस पुर्णपणे प्रतिबंध व्हावा करीता मा पोलीस आयुक्त श्री कृष्ण प्रकाश यांनी सुचना दिल्या होत्या त्यानुसार मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. पद्माकर घनवट सो. व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी पथक, श्री सतीश पवार यांनी वेळोवेळी अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या व मार्गदर्शन केले होते.

त्याप्रमाणे दि.०१/०४/२०२२ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथकाकडील वपोनि श्री. सतिश पवार, सपोनि श्री. प्रशांत महाले, पोउपनि श्री. राजन महाडीक व पोलीस अंमलदार असे चाकण पोलीस स्टेशन हददीमध्ये चाकण-शिक्रापुर रोडवर पेट्रोलींग करीत मौजे मोहितेवाडी येथे आले असता पोलीस अंमलदार संदीप पाटील, मनोज राठोड व अशोक गारगोटे यांना त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक चारचाकी आयशर गाडी जिचा आरटीओ क्र. एमएच १२ क्युडब्लु ५६९३ असा असुन त्यामध्ये एक इसम गांजा हा अंमली पदार्थ घेवुन शिक्रापुर-चाकण रोडने शेलपिंपळगाव येथे येणार आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळताच वपोनि सतीश पवार यांनी सपोनि महाले व पोउपनि महाडीक यांच्या दोन टिम तयार करुन मौजे मोहितीवाडी येथील हॉटेल संतोष समोरील रोडवर गाडी अडविण्याकरीता ट्रप लावला. काही वेळाने माहितीमध्ये नमुद केलेप्रमाणे एक चारचाकी आयशर क्र. एमएच १२ क्युडब्लु ५६९३ हि पोलीसांचे दिशेने येताना दिसली. सदरची गाडी वपोनि सतीश पवार यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली शिताफिने अडवुन गाडीतुन एका इसमास ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव व पत्ता विचारुन गाडी कोणाची आहे असे विचारले असता त्याने त्याचे नाव **गोकुळ शिवाजी आगे, वय २८ वर्षे रा.मु.पो. किट्टी, आडगाव ता.माजलगाव जि.बिड** असे असल्याचे सागुन गाडी त्याचेच मालकीची असल्याचे सांगितले. सदर गाडीची पंचांसमक्ष झडती घेतली असता सदर **गाडीमध्ये मागील बाजुस असलेल्या गुडस कॅरीअर मध्ये एकुण ९३ पुडे/पाकिटे मिळुन आली. त्या पुडयांबाबत गोकुळ शिवाजी आगे यास विचारले असता तो उडवाउडवीची उत्तरे देवु लागल्याने त्याचा अधिक संशय आल्याने सदरचे पुडे/पाकिटे पंचांसमक्ष उघडुन पाहिले असता त्यामध्ये गांजा हा अंमली पदार्थ मिळुन आला. इसम नामे गोकुळ शिवाजी आगे याचेकडील आयशर या गाडीमध्ये एकुण ९३ पुडे/पाकिटे यांमध्ये एकुण ४९,४४,५२५/- रुपये किंमतीचा १९८ किलो गांजा मिळुन आला.**

आरोपीकडे कारवाई दरम्यान केलेल्या चौकशीमध्ये त्याने त्याचे आयशर या गाडीमध्ये ओरिसा राज्य येथुन आणलेला गांजा हा इसम नामे अरुण जगन्नाथ मोहिते रा. शेलपिंपळगाव ता.खेड जि.पुणे व ज्ञानेश्वर उत्तम

मोहिते रा. शिरगाव रोड, सोमाटणे फाटा ता.मावळ जि.पुणे यांचे मदतीने आणला असल्याचे सांगितले वरुन तात्काळ ताब्यात घेण्यात आले. मिळुन आलेला गांजा हा दिपक शिवराम पवार व रविंद्र उत्तम मोहिते दोघे रा लेंडेवाडी ता दौंड जि पुणे यांचा असल्याचे समोर आले आहे.

**इसम नामे गोकुळ शिवाजी आगे याचेकडुन एकुण ६३,३४,४७५/- रुपये किंमतीचा १९८ किलो गांजा, गांजाची वाहतुक करण्याकरीता वापरण्यात आलेले चारचाकी वाहन, वाहनातील इतर साहित्य व मोबाईल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

इसम **नामे १. गोकुळ शिवाजी आगे, २. अरुण जगन्नाथ मोहिते, ३. ज्ञानेश्वर उत्तम मोहिते, ४. दिपक शिवराम पवार (पाहिजे) व ५. रविंद्र उत्तम मोहिते (पाहिजे) यांचेविरुध्द चाकण पोलीस स्टेशन गु.र.क्र. ४७२/२०२२ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क),२०(ब)(त्त)(क), २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन दाखल गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री देवडे, चाकण पोलीस स्टेशन हे करीत असुन अ.क्र. १ ते ३ हे दि ०६/०४/२०२२ रोजीपर्यंत पोलीस कोठडीमध्ये आहेत.**

यातील दिपक शिवराम पवार हा आंतरराज्य गांजा तस्करी करणारा मुख्य आरोपी असुन त्याचेवर यापुर्वी

१. चाकण पोलीस स्टेशन गु.र.क्र. १२७१/२०२१ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क),२०(ब)(त्त)(क), २९

२. चाकण पोलीस स्टेशन गु.र.क्र. ४९/२०२२ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क),२०(ब)(त्त)(क), २९ असे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगीरी हि मा.पोलीस आयुक्त, श्री. कृष्ण प्रकाश सो, मा.अप्पर पोलीस आयुक्त, श्री. डॉ.संजय शिंदे, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री. डॉ.काकासाहेब डोळे सो, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री. पदमाकर घनवट, यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सतिश पवार, सपोनि श्री. प्रशांत महाले, पोउपनि श्री. राजन महाडीक व पोलीस अंमलदार बाळासाहेब सुर्यवंशी, मोमीन, पोहवा/राजेंद्र बांबळे, दिनकर भुजबळ, संतोष दिघे, पोना/संदीप पाटील, मनोज राठोड, संतोष भालेराव, प्रसाद कलाटे, विजय दौंडकर, अजित कुटे, दादा धस, पोशि/अशोक गारगोटे, प्रसाद जंगीलवाड, मपोना/अनिता यादव, पो.शि.पांडुरंग फुंदे, पोहवा नागेश माळी, पोशि/पोपट हुलगे यांनी केली आहे.